defending human rights in the courts and beyond

# महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांना तातडीचे याचिका पत्र

१७ मे २०२१

प्रति,

१. श्री. उद्धव ठाकरे
माननीय मुख्यमंत्री

२. श्री. दिलीप वळसे पाटील
माननीय गृहमंत्री

**या याचिकेच्या प्रती यांना पाठवल्या आहेत:**

३. श्री. संजय कुमार
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

४. श्री. एस.व्ही. अचामे
अधीक्षक, तळोजा मध्यवर्ती कारागृह
नवी मुंबई

५. श्री. सी.ए. इंदूरकर
अधीक्षक, भायखळा जिल्हा कारागृह
मुंबई

**विषय:** भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणातील सर्व आरोपींची कोविडच्या दुसऱ्या लाटेदरम्यान तात्पुरत्या जामिनावर सुटका करण्याबाबत

**प्रिय श्री उद्धव ठाकरे,**
सिटिझन्स फॉर जस्टिस अँड पीस (सीजेपी) या सर्व भारतीयांच्या स्वातंत्र्य आणि घटनात्मक हक्कांचे समर्थन आणि संरक्षण करण्यासाठी समर्पित मानवी हक्क चळवळीमध्ये, आम्हाला एल्गार परिषद आणि भीमा-कोरेगाव हिंसाचार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या १५ आरोपींची

Nirant, Juhu Tara Road, Juhu, Santacruz (West), Mumbai – 400049.
Website: https://cjp.org.in/ Email: info@cjp.org.in Fax: 022-26608252

तीव्र चिंता वाटत आहे. त्यांच्या आरोग्याशी संबंधित काही अत्यंत विचलित करणाऱ्या त्रासदायक घटनांबद्दल आम्हाला समजले आहे, ज्यामुळे त्यांची तात्पुरत्या जामिनावर त्वरित सुटका करणे समर्थनीय बनते.

फादर स्टॅन स्वामी **(८४ वर्षांचे)**, प्रोफेसर हनी बाबू **(५५ वर्षांचे)**, ॲड. सुधा भारद्वाज **(६० वर्षांचे)**, ॲड. सुरेंद्र गडलिंग आणि इतर या सर्व भीमा कोरेगाव (बीके) प्रकरणातील राजकीय कैद्यांची प्रकृती स्वतंत्रपणे गंभीर आहे. कोविड-१९ च्या या बेलगाम अशा दुसऱ्या लाटेचा महाराष्ट्रातील आपल्या तुरुंगांवरही परिणाम झाला असून, तुरुंगांमध्ये कित्येक कैदी बाधित झाल्याच्या वृत्तामुळे परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे.

आम्ही, मानवी हक्कांचे रक्षण करण्याच्या आमच्या प्रयत्नात या कारणास लोकांचा पाठिंबा मिळवण्यासाठी change.org वर दोन याचिका सुरू केल्या; एक सर्व राजकीय कैद्यांच्या सुटकेशी संबंधित आणि दुसरी स्वतंत्रपणे प्रोफेसर हनी बाबू यांच्यासाठी, त्यांच्या खालावलेल्या तब्येतीमुळे. आम्हाला यावर उत्स्फूर्त असा हृदयस्पर्शी प्रतिसाद मिळाला असून आत्तापर्यंत एकत्रितपणे एकूण १३,९०० स्वाक्षऱ्या (अंदाजे) मिळाल्या आहेत आणि अजूनही मिळत आहेत.

**शिक्षणतज्ज्ञ आनंद तेलतुंबडे, शोमा सेन आणि हनी बाबू (जीटी रुग्णालयात); आदिवासी हक्क कार्यकर्ते फादर स्टॅन स्वामी आणि महेश राऊत; कवी सुधीर ढवळे; वकील सुरेंद्र गडलिंग आणि सुधा भारद्वाज; लेखक-संशोधक-पत्रकार गौतम नवलखा, कार्यकर्ते रोना विल्सन, अरुण फेरेरा आणि व्हरनॉन गोन्साल्विस आणि कबीर कला मंच या सांस्कृतिक गटाचे सदस्य : सागर गोर्खे, रमेश घैचोर आणि ज्योती जगताप या सर्वांच्या लोकशाही हक्कांचे उल्लंघन करण्यात आले आहे.**

**फादर स्टॅन स्वामी यांची तब्येत खालावली**

ऑक्टोबरमध्ये अटक होताना फादर स्वामी यांना शेवटचे पाहिलेले फादर झेवियर म्हणाले की, फादर स्वामी यांची वेदना सहन करण्याची क्षमता प्रचंड आहे आणि ते कधीही तक्रार करत नाहीत. तरीही काल सकाळी **(१४ मे २०२१)** त्यांनी वेदना होत असल्याची तक्रार केली. माहितीच्या उपलब्धतेच्या प्रचंड समस्येवर त्यांनी टीका केली होती, ज्याची नंतर इतर वक्त्यांनीही पुष्टी केली. स्वामींचा संपर्क म्हणून तळोजा तुरुंगात नोंदणी केली असली, तरी झेवियर सध्या तुरुंगात असलेल्या स्वामींना फोन करू शकत नाही. ते स्वामींच्या साप्ताहिक कॉल्सची वाट पाहतात. ते म्हणतात की हे कॉल "गोंगाट असलेले आणि काहीही ऐकायला कठीण" असे असतात. त्यांच्या शेवटच्या कॉलदरम्यान (तारीख माहिती नाही) स्वामी यांनी खोकला, ताप, जुलाब असल्याची

आणि आयुर्वेदिक डॉक्टरांनी दिलेल्या अँटिबायोटिक्सशिवाय कोणतीही मदत न मिळण्याची तक्रार केली होती.

**प्रोफेसर हनी बाबूंची प्रकृती गंभीर**

प्रोफेसर हनी बाबू डोळ्यांच्या गंभीर संसर्गाने ग्रस्त आहेत, ज्याचा परिणाम एका डोळ्याची दृष्टी जाण्यात होऊ शकतो. या ५५ वर्षीय प्राध्यापकांची १३ मे रोजी कोव्हिड-१९ ची चाचणी देखील पॉझिटिव्ह आली असून सध्या ते जीटी हॉस्पिटलच्या कोव्हिड वॉर्डमध्ये दाखल आहेत. त्याच्या डोळ्यांचा संसर्ग अजूनही गंभीर असल्याने नेत्रतज्ज्ञांकडूनही त्यांच्यावर उपचार चालू आहेत. त्याची पत्नी जेनी रोवेना यांच्या मते, नसांना आणि स्नायूंना हानी पोहोचल्यामुळे ते दोन्ही डोळ्यांमध्ये समन्वय साधू शकत नाही आणि डाव्या डोळ्यांमध्ये दुहेरी दृष्टी कायम आहे.

१४ मे रोजी जीटी रुग्णालयात नेले जाण्यापूर्वी, हनी बाबू यांना महाराष्ट्रातील तळोजा मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले होते आणि ३ मे २०२१ पासून डोळ्यांचा तीव्र संसर्ग, वेदना आणि हळूहळू दृष्टी कमी होत असल्याची तक्रार ते करत होते. त्यांची पत्नी जेनी रोवेना यांनी त्यांचे बंधू हरीश एम.टी. आणि एम.टी. अन्सारी यांच्यासह ११ मे रोजी एक प्रसिद्धीपत्रकही जारी केले होते, ज्यात म्हटले होते की, अँटी-बॅक्टेरियल मलम लावूनही त्याच्या संसर्गात कोणतीही सुधारणा झालेली नाही. तुरुंगात पाण्याची तीव्र कमतरता असल्यामुळे त्यांना त्यांचा डोळा धुण्यासाठीही स्वच्छ पाणी उपलब्ध नव्हते आणि त्यांना त्यावर ड्रेसिंग करण्यासाठी मळलेला टॉवेल वापरणे भाग पडले होते.

तुरुंगाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याने हनी बाबू यांना सांगितले होते की, त्याच्या डोळ्याच्या संसर्गावर उपचार करण्यासाठी तुरुंगात पुरेशी संसाधने नाहीत, म्हणून प्राध्यापकांनी ताबडतोब नेत्रतज्ज्ञांना दाखवण्याची विनंती केली. मात्र त्यांना नेत्रतज्ज्ञांकडे नेण्यात आले नाही आणि याचे कारण तुरुंग अधिकाऱ्यांनी "एस्कॉर्ट ऑफिसर उपलब्ध नव्हता" असे सांगितले आहे.

त्यांच्या वकील श्रीमती. पयोशी रॉय यांनी ६ मे २०२१ रोजी तळोजा कारागृहाच्या अधीक्षकांना ईमेल पाठवल्यानंतर मात्र त्यांना ७ मे २०२१ रोजी वाशी येथील सरकारी रुग्णालयात नेण्यात आले, तेथे नेत्ररोगतज्ज्ञाने त्यांची तपासणी केली, काही अँटी-बॅक्टेरियल औषधे लिहून दिली आणि पाठपुरावा उपचारासाठी पुन्हा भेटीसाठी येण्याचा सल्ला दिला. मात्र पुन्हा एस्कॉर्ट अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे त्यांना सल्ला दिल्याप्रमाणे पाठपुराव्याच्या तपासणीसाठी नेण्यात आले नसल्याचे वृत्त आहे. श्रीमती. रॉय यांनी आठवेळा कॉल करून आणि आणखी एक ईमेल पाठवून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून दिल्यानंतर अखेरीस १० मे रोजी त्यांना जेजे रुग्णालयात नेण्यात आले. जेव्हा त्यांना जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले तेव्हा त्याची

कोव्हिड-१९ ची चाचणी पॉझिटिव्ह आली. सीजेपीसारख्या मानवी हक्क संघटना, प्रसारमाध्यमे आणि राजकीय नेत्यांच्या दबावानंतर हनी बाबू यांना मुंबईतील जीटी रुग्णालयात हलवण्यात आले.

१५ मे रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत, जिथे हनी बाबू यांचे कुटुंबीय उपस्थित होते, सीजेपीला समजले की बाबूंच्या कुटुंबाला योग्य निदान, त्यांना दिला जात असलेला उपचार याबद्दल माहिती देण्यात आलेली नाही, जरी त्यांनी त्यांचा सीटी काऊंट, आरोग्याबद्दलची आकडेवारी किंवा इतर कोणत्याही चाचण्यांचे निकाल ही माहिती मिळण्यासाठी वारंवार आग्रह केला तरीही. प्रोफेसर बाबूंचे बंधू डॉ. हरीश थराईल म्हणाले की, त्यांचे कुटुंबीय तुरुंग प्रशासनाकडून आणि राष्ट्रीय तपास एजन्सीकडून (एनआयए) अधिकृत माहितीची प्रतीक्षादेखील करत आहे.

**सुधा भारद्वाज यांची बिघडती तब्येत**

सुधा भारद्वाज यांच्या कुटुंबियांच्या वतीने बोलताना स्मिता गुप्ता म्हणाल्या की, भारद्वाज यांची मुलगी मायशा यांना अजूनही तुरुंग अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात अडचणी येतात. भारद्वाज यांना तुरुंगवासापूर्वीच अनेक इतर व्याधींचा त्रास झाला होता. त्यांना असलेला फुफ्फुसाचा क्षयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच खराब पोषणासह हवेशीर वातावरणाचा अभाव यामुळे त्यांना कोव्हिड-१९ चा अधिक धोका आहे.

सुधाला संधिवातही आहे. ती जेमतेम खाऊ शकते अशी तिच्या दातांची अवस्था आहे. तिचे केस गळले आहेत, वजन कमी झाले आहे आणि गेल्या वर्षी एका रिपोर्टमध्ये त्यांना इसबचा त्रास असल्याचे दिसून आले आहे, असे कार्यकर्त्या स्मिता गुप्ता यांनी सांगितले. त्या पुढे म्हणाल्या की, यापूर्वी तुरुंगातील ४० जणांची कोविड चाचणी वेगवान अँटीजन चाचणीदरम्यान पॉझिटिव्ह आली होती. या चाचणीतून काही संसर्ग झालेल्या व्यक्ती सुटतात हे ज्ञात आहे. शेवटच्या कॉलदरम्यान, ७ मे रोजी त्यांना लस देण्यात आली तेव्हापासून तब्येत बिघडत असल्याचे भारद्वाज बोलल्या होत्या. त्यांनी तीन आठवडे तीव्र अतिसार, शरीरात अशक्तपणा, चव न लागणे हे त्रास होत असल्याचे सांगितले होते. दरम्यान, शरीराकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसतानाही तुरुंग अधिकाऱ्यांनी केवळ अँटिबायोटिक्स देऊ केली.

**सुरेंद्र गडलिंग यांची तब्येत खराब आहे**

ॲडव्होकेट सुरेंद्र गडलिंग यांची पत्नी मिनल यांनी आपल्या पतीला चष्मा तसेच औषधे पाठवू न दिल्याबद्दल अधिकाऱ्यांची निंदा केली. जेव्हा त्याच्या दृष्टीला त्रास झाला, तेव्हा सुरेंद्र गडलिंग यांनी त्यांची तपासणी करण्याची मागणी केली होती परंतु कोविड-१९ मुळे सर्व डॉक्टर तुरुंगाबाहेर गेले आहेत असे त्यांना सांगण्यात आले. शेवटी त्यांच्या सोबतच्या कैद्यांनी त्यांना

स्वतःच पातळी तपासण्यास सांगितले, जी खूप जास्त असल्याचे दिसून आले आहे. जुलै २०२० मध्येसुद्धा त्यांना कोव्हिडची लक्षणे दिसली होती आणि जुलाब व तीव्र खोकल्याची चिंता निर्माण झाली होती परंतु त्यांना कोणताही औषधोपचार देण्यात आला नाही.

**महेश राऊत यांची प्रकृती**

कैदी महेश राऊतची बहीण मोनालीने पत्रकार परिषदेत सांगितले की, कशाप्रकारे तिने आपल्या भावाच्या सांगण्यावरून जेलरला औषधासाठी कॉल केला होता. त्याने थर्मामीटर आणि ऑक्सिमीटरदेखील मागितले होते परंतु अधिकाऱ्यांनी सांगितले की तिला असे पार्सल पाठविण्याची परवानगी नाही.

मूलभूत मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा मुद्दा केवळ तळोजा तुरुंगातील प्रोफेसर हनी बाबू यांच्यापुरता मर्यादित नाही. भीमा कोरेगावच्या १४ आरोपींच्या कुटुंबीयांनी आणि मित्रांनी वारंवार ठामपणे सांगितले आहे की, जवळपास कोणत्याही पायाभूत सुविधा नसलेल्या तुरुंगात, प्रचंड गर्दीत व अस्वच्छ परिस्थितीत राहिल्यामुळे त्यांची तब्येत कशी खालावली आहे.

**भीमा कोरेगाव आरोपींना मूलभूत हक्क नाकारले गेले**

२०१८ पासून तुरुंगात असलेल्या भीमा कोरेगाव प्रकरणातील सर्व आरोपींच्या कुटुंबियांनी या कच्च्या कैद्यांशी (अंडरट्रायल) संवाद साधता येत नसल्याच्या आणि तळोजा व भायखळा कारागृहातील तुरुंग अधिकाऱ्यांकडून अनास्थापूर्वक वागणुकीच्या तक्रारी केल्या आहेत.
१५ मे रोजी आयोजित पत्रकार परिषदेत सीजेपीला या राजकीय कैद्यांच्या भयंकर कहाण्या आणि अशा असामान्य परिस्थितीत आरोग्यसेवेच्या पायाभूत सुविधांच्या अभावामुळे त्यांच्या होत असलेल्या अनन्वित छळाबद्दल समजले. कार्यकर्त्या हर्षाली पोतदार म्हणाल्या की, वरील दोन्ही कारागृहांमधील स्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. त्या म्हणाल्या की त्यांना मिळालेल्या माहितीनुसार तळोजा येथे भोजन व्यवस्थेशी संबंधित कर्मचाऱ्यांसह सुमारे ६० तुरुंग कर्मचाऱ्यांना कोव्हिड-१९ चा संसर्ग झाला असल्याचे सांगण्यात येत आहे.

कच्च्या (अंडरट्रायल) कैद्यांच्या बाबतीत, कोव्हिड-चाचण्या पुरेशा प्रमाणात केल्या गेल्या नाहीयेत, जरी हनी बाबूसारखे लोक कोविड पॉझिटिव असल्याचे समजले असले तरीही. न्यायालयाच्या आदेशांचे पालन न करून तळोजा कारागृहाचे अधिकारी कैदी आणि त्यांचे कुटुंबीय या दोघांचा मानसिक छळ करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पोतदार यांनी असेही नमूद केले की, न्यायालयाच्या आदेशानंतरही कोणत्याही कुटुंबाला कोणत्याही अंडरट्रायलकडून २० मिनिटांचा व्हिडिओ कॉल आलेला नाही. ऑडिओ कॉल्सच्या बाबतीत, अपेक्षित किमान दहा मिनिटांच्या ऑडिओ कॉल ऐवजी लोकांना जेमतेम तीन ते चार मिनिटांचा ऑडीओ कॉल करता

आला. पत्रेदेखील अधिकाऱ्यांद्वारे कसून छाननीनंतर तुरुंगाच्या आत आणि बाहेर एक महिना उशिराने पोहोचतात.

**तुरुंगात चाचण्यांच्या अभावामुळे, खरे तर आरटी-पीसीआर चाचण्या कैद्यांना नाकारण्यात आल्यामुळे, महाराष्ट्रात आत्मसन्मानाने जगण्याच्या मूलभूत अधिकाराचे घोर उल्लंघन झाले आहे. आता, चाचण्यांच्या अभावासोबतच, कोव्हिड-१९ चा अनिर्बंध प्रसार होत आहे, ज्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. आता सुनावणी दृष्टिपथात नसताना, त्यांना त्यांचा जीव गमवावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

**कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेनंतर सर्वोच्च न्यायालयाचा आदेश**

**माननीय सर्वोच्च न्यायालयाने, कोव्हिड-१९ विषाणूचा तुरुंगांमध्ये संसर्ग,** (स्वाधिकारे डब्ल्यू.पी. दिवाणी. क्र. १) या प्रकरणात कारागृहांमधील प्रचंड गर्दीची गंभीरपणे दखल घेतली आहे आणि इतर कच्च्या कैद्यांची सुटका करण्याचे आदेश दिले. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने असेही आदेश दिले होते की, "दैनंदिन स्वच्छतेची पातळी राखणे आणि सॅनिटेशन सुधारणे आवश्यक आहे. तुरुंगातील कैद्यांमध्ये प्राणघातक विषाणूचा संसर्ग होऊ नये म्हणून योग्य त्या खबरदाऱ्या घेतल्या जाव्यात." परंतु तुरूंग अधिकारी अतिगर्दीच्या या तुरुंगात विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक खबरदाऱ्या घेण्यात किंवा अगदी त्यांना मूलभूत सुविधा पुरवण्यातही अपयशी ठरले आहेत.

न्यायालयाने असेही म्हटले होते की, "..या साथीच्या रोगाविरुद्धच्या लढाईत पारदर्शक प्रशासनाचा मोठा फायदा होतो". नेमक्या याच गोष्टीची इथे स्पष्टपणे उणीव आहे असल्याचे दिसत असून भीमा कोरेगाव प्रकरणातील आरोपी कैद्यांचे कुटुंबीय तुरूंगांतील त्यांचे स्वास्थ्य जाणून घेण्यासाठी संपर्कासाठी तळमळत आहेत.

न्यायालयाने ७ मे रोजी त्याच्या आदेशात, गर्दीने भरलेल्या तुरुंगांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन असे नोंदवले की भारतात चार लाखांहून अधिक कैदी आहेत आणि तुरुंग त्यांच्या इष्टतम क्षमतेपेक्षा अति जास्त भरलेले आहेत. त्यात म्हटले होते, "आपल्या लक्षात येऊ शकते की, तुरुंगांमधील गर्दी कमी करण्याची गरज ही तुरुंगातील कैदी आणि तिथे काम करणारे पोलिस कर्मचारी या दोघांच्या आरोग्याशी आणि जीवनाच्या हक्काशी संबंधित बाब आहे. कोव्हिड-१९ चा प्रभाव कमी करण्यासाठी फौजदारी न्याय व्यवस्था, आरोग्याचे धोके आणि आरोपींचे हक्क यांचे या न्यायालयाने प्रभावीपणे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. विषाणूचे हा जीवघेणा प्रसार लक्षात घेऊन, न्यायालयाने काही कच्च्या कैद्यांना आणि सामान्य कैद्यांना सोडण्याचे आदेश दिले आणि या कैद्यांना सोडण्याचा विचार करण्यासाठी राज्यांना उच्चस्तरीय समित्यांना सहभागी

करून घेण्यास सांगितले. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश लक्षात घेऊन, अटकेत असलेल्या या सर्व व्यक्तींच्या आरोग्याच्या हक्काचा विचार करता, त्यांची विनाविलंब सुटका करणे अत्यावश्यक आहे.

**कैद्यांना वैद्यकीय मदतीशी संबंधित कायदे**

सर, देशातील सर्व नागरिकांचे आरोग्य आणि कल्याण यांचे संरक्षण करणे आणि राज्याच्या अकार्यक्षमतेमुळे हे आरोग्य मालवणार नाही याची काळजी घेणे हे राज्याचे कर्तव्य आहे. कारागृह कायदा, १८९४ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कारागृह वर्गीकरण नियम, २०१५ मध्ये कैद्यांसाठी आणि खटला चालू असलेल्या आरोपींसाठी तातडीच्या वैद्यकीय उपचारांसाठीच्या अनिवार्य तरतुदी नमूद केल्या आहेत.

**नियम ३(२)(५)** मध्ये नमूद केले आहे की, मुख्य वैद्यकीय अधिकारी:
"तुरुंगाला होणाऱ्या पाणीपुरवठ्याची गुणवत्ता आणि प्रमाण याकडे विशेष लक्ष देईल. पाणी दूषित झाल्याचा संशय आल्यास, तो पाण्याचे नमुने स्थानिक चाचणी प्रयोगशाळांमध्ये पाठवेल आणि आवश्यक तेथे सुधारणात्मक उपाययोजना करेल."

**(६)** महिन्यातून किमान एकदा तरी पाणी पुरवठ्याचे स्रोत, परिसर आणि वितरणाची तपासणी करेल. जेव्हा प्रदूषण किंवा दूषित होण्याची शक्यता आहे असा संशय येण्यासारखे कारण असेल, तेव्हा तो क्लोरिनेशनद्वारे किंवा इतर पद्धतींनी पाण्याची शुद्धता सुनिश्चित करण्यासाठी योग्य पावले उचलेल.

**(१४)** वैद्यकीय अधिकारी आजारी कैद्यावर टेलि-मेडिसिनच्या मदतीने उपचार करू शकेल आणि जर कैद्यावर उपचार करण्यासाठी टेलि-मेडिसिनचे आणि तुरुंग रुग्णालयातील उपचार अपुरे असतील तरच, आजारी कैद्याला सरकारी रुग्णालयात पाठवू शकेल."

**सर्वोच्च न्यायालयाचे इतर आदेश**

भारताच्या संविधानाच्या कलम २१ नुसार कच्च्या आणि सामान्य कैद्यांनाही आरोग्याचा अधिकार आहे. **सुनील बत्रा (ii) विरुद्ध दिल्ली प्रशासन** (१९८०) ३ एससीसी ४८८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, कायद्याने स्थापन केलेल्या प्रक्रियेनुसार कारागृहात असलेल्या एखाद्या व्यक्तीला मूलभूत मानवी हक्क नाकारले जाऊ शकत नाहीत. अलीकडेच तुरुंगात असलेले केरळस्थित पत्रकार सिद्दीक कप्पन हे मथुरा तुरुंगात पडले आणि नंतर त्यांची कोविड-१९ चाचणी पॉझिटिव्ह आली, तेव्हा त्यांना अधिक चांगल्या काळजीसाठी आणि वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात यावे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. **केरळ युनियन**

**ऑफ वर्किंग जर्नलिस्ट्स विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि इतर** (रिट याचिका फौजदारी २०२० चा क्रमांक ३०७), या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, “आम्ही असे नमूद करतो की सर्वात मौल्यवान मूलभूत 'जीवनाचा हक्क' हा अगदी कच्च्या कैद्यालाही बिनशर्त लागू होतो.”

कोव्हिड-१९ च्या केसेसमध्ये वाढ होत असताना आणि भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणातील खटला सुरू होण्याची जवळपास कोणतीही चिन्हे नसताना, अटक केलेल्या सर्व व्यक्तींना चांगल्या काळजीसाठी आणि उपचारांसाठी सोडणे हेच व्यावहारिक आहे, ज्याची त्यांना नितांत गरज आहे.

याच प्रकरणात अशाच तरतुदींनुसार आरोप ठेवण्यात आलेल्या डॉ. वरवरा राव यांना फेब्रुवारी, २०२१ मध्ये त्यांची ढासळती आरोग्यस्थिती लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. खंडपीठाने नमूद केले होते की डॉ. राव यांना अंडरट्रायल म्हणून सातत्याने तुरुंगात ठेवणे हे त्यांच्या अनिश्चित आरोग्यस्थितीचा विचार करता, घटनेच्या कलम २१ अन्वये त्यांच्या जीवनाच्या हक्काचे उल्लंघन ठरेल.

**डॉ. पी.व्ही. राव विरुद्ध एनआयए आणि इतर** (२०२१ चे फौजदारी अपील क्रमांक ५२) मध्ये न्यायालयाने म्हटले आहे, “अन्यथा देखील, सध्याच्या प्रकरणात प्रतिवादींनी हे मान्य केले आहे की फिर्यादीद्वारे किमान २०० साक्षीदारांची तपासणी केली जाईल. आरोपपत्रच तब्बल १००० पानांचे बनले आहे... आमचे असे मत आहे की, एखाद्या अंडरट्रायल व्यक्तीला तुरुंगात पाठवले जाते, आणि नंतर सरकारी रुग्णालयांमध्ये हलवले जाते, तिथे त्याची तब्येत आणखी खालावते, शेवटी न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर खासगी स्पेशालिटी रुग्णालयांमध्ये हलवले जाते आणि केवळ त्यांचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे म्हणून या अंडरट्रायल व्यक्तीची अशी ही इकडून तिकडे हलवाहलव चालूच राहण्याकडे एक घटनात्मक न्यायालय म्हणून आम्ही मूकपणे पाहू शकत नाही...”

तुरुंगांची वाईट परिस्थिती आणि इतक्या गंभीर काळात त्यांच्या आरोग्याबद्दल काहीही माहिती नसणे, याकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहण्याची नितांत आवश्यकता आहे. राज्य सर्व कैद्यांसाठीच्या सुविधांमध्ये वाढ करेल या आशेने मुंबई उच्च न्यायालयानेही तुरुंगातील अपुऱ्या सुविधांची दखल घेतली होती. स्वतःहून दखल घेतलेल्या जनहित याचिकेत, जिची नोंद त्याने अशी केली आहे, **स्वतःच्या प्रस्तावावर उच्च न्यायालय विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर** (स्वाधिकारे जनहित याचिका २०२१ चा क्रमांक १) यामध्ये, मुख्य न्यायमूर्ती दिपांकर दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती जी.एस. कुलकर्णी यांच्या खंडपीठाने हस्तक्षेप करणाऱ्या अर्जदारांपैकी एकाने केलेल्या निवेदनाची नोंद घेतली “की तुरुंगांमध्ये डॉक्टरांची, परिचारिकांची आणि इतर

मेडिकल कर्मचाऱ्यांची पुरेशी संख्या नाही. यासाठी तळोजा कारागृहाचा संदर्भ देण्यात आला आहे जिथे केवळ ३ (तीन) डॉक्टर आहेत, तेही आयुर्वेदाचे."

"जर खरंच तसं असेल, तर तुरुंगांतील कैद्यांसाठी राज्याच्या आरोग्य आणि वैद्यकीय सुविधांचे हे एक निकृष्ट प्रतिबिंब आहे, त्यांच्या गरजांकडे लक्ष देण्याबाबतची अनास्था आणि उदासीनता ही विश्वासघातकी आहे", असे खंडपीठाने स्वतः २९ एप्रिल २०२१ च्या आदेशाद्वारे नमूद केले होते.

तळोजा तुरुंगाची कैद्यांची क्षमता २,१२४ असताना तिथे आजच्या घडीला सुमारे ३,५०० कैदी आहेत, म्हणजे १३३ टक्के रहिवासी दर आहे. काही कैद्यांची कोव्हिड चाचणी निगेटिव्ह येत असली तरीही तुरुंगाबाहेर चाचणी केली असता ती पॉझिटिव्ह येते हे देखील लक्षात घेणे महत्वाचे आहे.

सर, भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ अन्वये आरोग्याचा हक्क हा जीवनाच्या हक्कासाठी मूलभूत आहे आणि सर्व नागरिकांच्या या हक्काचे रक्षण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. **पंजाब राज्य आणि इतर विरुद्ध मोहिंदरसिंग चावला** (१९९६ चा दिवाणी अपील क्रमांक १६९८०-८१) मध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, "आरोग्याचा हक्क हा जीवनाच्या हक्काचा अविभाज्य घटक आहे, हे आता कायद्याने निश्चित झाले आहे. आरोग्य सुविधा पुरवणे हे सरकारसाठी घटनात्मकदृष्ट्या बंधनकारक आहे." **किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड विरुद्ध कर्मचारी राज्य विमा महामंडळ** १९९६ (२) एससीसी ६८२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्याचे आपल्या नागरिकांचे संरक्षण करण्याचे हेच बंधन आणि कर्तव्य अधोरेखित केले.

**विनवणी**

माननीय सर, या कच्च्या कैद्यांसाठी साक्षात मृत्यू पुढ्यात उभा ठाकला आहे. बाळ गंगाधर टिळक, ज्योतीराव फुले, केशव कर्वे, प्रबोधनकार ठाकरे आणि भीमराव आंबेडकर अशा भारतीय बुद्धिवाद्यांच्या आणि समाजसुधारकांच्या शिकवणीचा व तत्त्वांचा वारसा लाभलेले हे महाराष्ट्र राज्य आता आपल्या नागरिकांना पूर्णपणे अनास्थेने आणि निष्ठुरतेने वागणूक देत आहे. तीन वर्षे उलटून गेली तरीही हे प्रमुख कार्यकर्ते, बुद्धिवादी, सामाजिक कार्यकर्ते, वकील, सांस्कृतिक कलाकार बनावट व खोट्या आरोपांखाली तुरुंगात आहेत.

सीजेपी माननीय मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांना नम्रपणे विनंती करत आहे की, या सर्व आरोपी व्यक्तींच्या जीवाला धोका असल्यामुळे त्यांची सुटका करण्याची शिफारस त्यांनी उच्चस्तरीय समितीकडे करावी. हे सर्व या देशाच्या कायद्याचे पालन करणारे नागरिक असून त्यांचे कुटुंबीय त्यांच्याबद्दल अत्यंत चिंताग्रस्त आहेत आणि त्यांच्या सुटकेची आतुरतेने वाट पाहत आहेत.

आपले विनम्र,

सिटिझन्स फॉर जस्टिस अँड पीस

Nirant, Juhu Tara Road, Juhu, Santacruz (West), Mumbai – 400049.
Website: https://cjp.org.in/ Email: info@cjp.org.in Fax: 022-26608252